सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ✆२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ✆२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:-१२ जानेवारी २०२३

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :-महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा- २०२१ गुण, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत**
**संदर्भ :- जाहिरात/अधिसूचना क्रमांक ६७/२०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे विषयांकीत लेखी परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. सदर निकालाद्वारे मुलाखतीकरीता पात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील ‘View’ अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढिलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करून ‘Save’ बटणवर क्लिक करावे.

(५) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक १३ जानेवारी, २०२३ ते दिनांक २२ जानेवारी, २०२३ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग